# भावी ग्रामीण उद्योजकांच्या निवडक प्रतिक्रिया

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

उमेद अभियानाअंतर्गत Micro Enterprise Consultants (MEC) हा पथदर्शी प्रकल्प रत्नागिरी, उस्मानाबाद आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये राबविला जात आहे. यासाठी केरळ येथील कुडुंबश्री हया संस्थेचे सहकार्य घेतले जात आहे.

या प्रकल्पाचा उदेश गावात MEC म्हणजेच उद्योजक तयार करुन, त्यांच्या क्षमता बांधणीतून एकंदरितच ग्रामीण भागात उद्यमशीलतेला चालना देणे, अर्थार्जनाच्या / उपजीविकेच्या संधीमधे वाढ करणे असा आहे.

या प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात सन २०१५ च्या ऑक्टोबर- नोव्हेंबर या महिन्यांमधे जिल्हास्तरीय माहिती कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. तसेच संपर्क अभियानही राबविण्यात आले. इच्छूक उमेदवारांची परिक्षा घेण्यात आली तसेच त्यांना या उपक्रमाची विस्तृत माहितीही देण्यात आली. या तीनही जिल्ह्यामधून सरासरी साठ उमेदवारांची निवड करण्यात आली, जे आपापल्या गावांमधील उदयोग-व्यवसाय वृध्दीसाठी काम करतील. या कार्यशाळांचे आयोजन डिसेंबर २०१४ च्या पहिल्या आठवडयात करण्यात आले.

या निवडप्रक्रियेसाठी कुडुंबश्रीचे प्रतिनिधी, प्रेरक MEC, व संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक तसेच उमेद अभियान व्यवस्थापक (उपजीविका), उमेद जिल्हा अभियान तसेच तालुका अभियान चमूचा सहभाग मिळाला.

या निवड प्रक्रियेनंतर MEC उमेदवारांनी त्यांच्या प्रतिक्रिया नोंदवल्या. त्यापैकी काही प्रातिनिधिक प्रतिक्रिया खाली दिल्या आहेत:

### श्रीनिवास विश्वंभर गिरी, उस्मानाबाद ( शिक्षण १२ वी )

मी अनेकवेळा स्पर्धा परिक्षांना बसलो पण उत्तीर्ण झालो नाही. त्यामुळे मला स्थैर्य मिळाले नाही. मी MEC ची परिक्षा चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झालो. ही बातमी सर्वप्रथम मी माझ्या पत्नीला व मुलांना सांगितली. ती ऐकून मुलांना एवढा आनंद झाली की त्यांनी मी परिक्षा पास झाल्याबद्दल त्यांच्या वर्गातील मुलांना चॉकलेट्स वाटली.

## संगिता गायकवाड, सिंधी- मेधे, वर्धा ( शिक्षण १२ वी )

माझ्या पतीचे माझ्या भावाला नेहमी सांगणे असायचे की तुझ्या बहिणीपेक्षा (म्हणजे माझ्यापेक्षा) जास्त शिकलेली बायको कर. माझे शिक्षण फार काही झालेले नाही. पण MEC म्हणून माझी निवड झाली आणि स्वयंरोजगाराची संधी मला मिळाली. ही बातमी मी फोन वरुन भावाला सांगितली. बातमी ऐकून त्यालाही आनंद झाला. माझे शिक्षण कमी असले तरी मला चांगली संधी मिळाली हे बघून त्याला माझ्या पतीच्या सांगण्याची आठवण झाली. त्याने स्वत: हून फोन करुन माझ्या पतीला सांगितले की ' यापेक्षा अजून जास्त शिक्षण ते काय ? ' भावाच्या बदललेल्या मतामागे मला मिळालेली रोजगाराची संधी कारणीभूत होती असे मला वाटते.

## बंडू रमेश मेश्राम, कचनूर, ता. आर्वी, जि. वर्धा

काही कारणांमुळे माझी नोकरी काही वर्षापूर्वी सुटली. बेरोजगार राहण्यापेक्षा कुल्फी विकण्याचा हंगामी स्वरुपाचा व्यवसाय करुन मी व माझी पत्नी गुजराण करत होतो. आमच्या संसाराबद्दल माझ्या सासऱ्यांनाही नेहमी चिंता वाटायची. माझी MEC म्हणून निवड झाल्याची बातमी मी त्यांना प्रथम सांगितली. त्यांना बरे वाटले. ते म्हणाले की जरी कामाचे स्वरुप आणि मिळणारा रोजगार निश्र्चित समजला नसला तरी तुला काम मिळाले ही चांगली गोष्ट झाली.

या प्रतिकियांवरुन असे दिसते की MEC प्रक्रियेने गावा- गावातील उद्योजक शोधण्याचे काम तर केलेच आहे तसेच यासारख्या अनेक व्यक्तींच्या उद्योजकतेला साद घालून त्यांच्या इच्छा - आकांशा पूर्ण करण्यासाठी एक सुवर्णसंधीही त्यांना मिळवून दिली आहे.

-o-